डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,

वाघापुर रोड, यवतमाळ - ४४५ ००१ (महाराष्ट्र)

**डॉ. के. डी. ठाकुर**
सहयोगी अधिष्ठाता

फोन - ०७२३२ २५१७४५
फॅक्स - ०७२३२ २५१७४५

ईमेल - advncab@pdkv.ac.in & vncab.ytl@gmail.com

जा.क्र. वनाकृजैम/यवत/२० /२०२१ दि. ०८/०४/२०२१

## दरपत्रक सुचना

विषयः– वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ करिता सहकारी संस्थांमार्फत ठेकेपध्दतीने/ कंत्राटी तत्वावर बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी दरपत्रक पाठविण्याबत

वाचा :–1) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक ल अकं. 42(3) दि. 08/08/2014
2) किमान वेतन अधिनियम 1948 अनुसार विद्यमान राहणीमान भत्ता

या सुचनेव्दारे खालील नमुद कामांकरिता **सहकारी संस्थांकडुन** ठेकेपध्दतीने/कंत्राटी तत्वावर बाहयस्त्रोतांमार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी दरपत्रके या कार्यालयास दि. 19/04/2021 रोजी 12.00 वाजे पर्यंत किंवा त्यापुर्वी सोबत दिलेल्या सुचना, अटी व शर्तीच्या अधीन राहुन मागविण्यात येत आहेत.

| अ. कं. | विवरण | शैक्षणीक अर्हता | मनुष्यबळ संख्या | दर प्रती व्यक्ती प्रती दिन (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| 1 | **प्रयोगशाळा परिचर (Skilled )**– प्रयोगशाळा स्वच्छ करणे, प्रयोगशाळेतील उपकरणे स्वच्छ करणे, प्रयोगशाळेत मदत करणे व इतर सांगीतलेली कामे करणे. | एस.एस.सी. उत्तीर्ण, अनुभवास प्राधान्य | 04 | |
| 2 | कंत्राटी मनुष्यबळ **(Unskilled)** –<br>पुरुष – मुलांचे वसतीगृह,<br>स्त्री – मुलींचे वसतीगृह,<br>पुरुष/ स्त्री – ग्रंथालय साफसफाई, देखभाल, प्रक्षेत्रावरील (शेतीची कामे), अतिथीगृह साफसफाई, कार्यालय स्वच्छता मिटींग हॉल, आस्थापना विभाग,शिक्षण विभाग,प्लेसमेंट सेल, क्लासरुम साफसफाई इ. | ––– | 17 | |
| 3 | स्वीपर कार्यालयातील स्वच्छता गृह मुलींचे व मुलांचे वसतीगृह, अतिथीगृह येथील स्वच्छतागृहाची स्वच्छता करणे इ. | ––– | 01 | |
| 4 | चौकीदार | ––– | 09 | |

## सुचना, अटी व शर्ती

1 वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ ही डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत शासकीय शैक्षणीक संस्था असल्यामुळे **GST Act Notification No. 12/2017 Central Tax (Rate) Dated 28/06/2017** नुसार मनुष्यबळ पुरविण्यासाठी GST लागु नाही.

2 निवीदा दरपत्रके कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेतच स्विकारले जातील. मुदतीनंतर येणारी निवीदा दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

3 डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कंत्राटी मजुरांकरीता असलेल्या दरांचे संदर्भानुसार अवलोकन करावे.

4 दरपत्रके सिलबंद पाकीटात पाठवावीत.

कृ.मागील पानावर पहावे

5 दरपत्रके या सुचनेचा संदर्भ क्र. नमुद करावा.

6 तसेच दरपत्रकातील नमुद दर लागु असलेल्या करांसहीत नमुद करावेत.

7 सदर कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ पुरविणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. तसेच दरपत्रकासोबत संस्थेचे नोंदणी, भविष्य निर्वाह नोंदणी, पॅन कार्ड, आधार कार्ड, अनुभव इत्यादी बाबतचे वैध्य प्रमाणपत्रे/दस्तावैज जोडण्यात यावे, अन्यथा दरपत्रक अस्विकार करण्यात येईल. तसेच GST नोंदणी असल्यास त्या संदर्भातील दस्तऐवज सोबत जोडण्यात यावेत.

8 शासन अणि विद्यापीठ नियमानुसार किमान वेतन दरामध्ये बदल झाल्यास विद्यमान कंत्राट समाप्त करण्यात येउन नव्याने लेखा प्रक्रीया राबवीण्यात येईल.

9 दरपत्रकामध्ये संस्थेचे सेवा शुल्क असल्यास वेगळे नमुद करावे.

10 दरपत्रके **सहयोगी अधिष्ठाता, वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ** यांचे नावाने दयावे तसेच पाकीटावर " **ठेकेपध्दतीने/कंत्राटी तत्वावर बाहयस्त्रोतांमार्फत मनुष्यबळ पुरविण्याकरिता दरपत्रक** " असे नमुद करावे.

11 प्रक्रीये पश्चात मंजुर दर हे केवळ आर्थिक वर्ष 2021–2022 करीता राहतील.

12 सदर कामे ही दैनंदीन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे दैनंदिन आठ तासाचे काम राहील.

13 एखादे मनुष्यबळास कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी मनुष्यबळाची व्यवस्था करणेची जबाबदारी कंत्राटदार/ठेकेदार यांची राहील .

14 सदर कामे ही पुर्णतः ठेकेपध्दती/कंत्राटी तत्वावर असल्याकारणाने मजुरांच्या वरिष्ठता यादीत कामाची अथवा मनुष्यबळच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.

15 कोणत्याही कंत्राटी मनुष्यबळाचे गैरवर्तवनुक व असमाधानकारक काम या सबबीवर त्यास कंत्राटदार/ठेकेदार मार्फत कामावर ठेवावे किंवा नाही याकरीता सहयोगी अधिष्ठाता, वनाकृजैम, यवतमाळ यांचा निर्णय अंतीम राहील.

16 कंत्राटी तत्वावरील मनुष्यबळाला दि. 08/08/2014 चे संदर्भाकींत शासन परीपत्रक व विद्यापीठ नियमानुसार वेतन देण्यात यावे.

17 कामावरील कंत्राटी मनुष्यबळास अपघात वीमा, भ.नि.नि. खाते वा वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मनुष्यबळाचे देय लाभ उपलब्ध करुन देण्याची संपुर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार/ठेकेदार यांची राहील.

18 सदर दरपत्रके दि.19/04/2021 रोजी 15.00 वाजता सहयोगी अधिष्ठाता यांचे कक्षात उघडण्यात येईल. तांत्रीक अडचण उद्भवल्यास दरपत्रके उघडण्याची दिनांक व वेळ बदलण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

19 शासन नियमांनुसार दरपत्रके स्विकारण्याचे अथवा अस्विकारण्याचे तसेच प्रक्रीया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

सहयोगी अधिष्ठाता
वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान
महाविद्यालय (डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला)

प्रतिलिपीः– प्रभारी अधिकारी, ARIS Cell, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना सदर दरपत्रक सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या विनंतीसह अग्रेषीत.